## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

### तक्रार क्रमांक : ७५६अ/२०२२

**तक्रारकर्ता, श्री.राजेंद्र विष्णु पातकर**
रा.४५५, शिवम बिल्डींग, भावे कंपाउंड कासारआळी,
ता.भिवंडी, जि.ठाणे.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त,
प्रभाग समिती क्र.५, भिवंडी निजामपूर शहर
महानगरपालिका, जुना एस.टी.स्टॅण्ड, कापआळी,
ता.भिंवडी, जि.ठाणे ४२१ ३०२.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त,
प्रभाग समिती क्र.५, भिवंडी निजामपूर शहर
महानगरपालिका, जुना एस.टी.स्टॅण्ड, कापआळी,
ता.भिंवडी, जि.ठाणे ४२१ ३०२.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ०२.०४.२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| ३०.०५.२०२२ | --- | ०२.०७.२०२२ | ०८.०८.२०२२ |

तक्रारकर्ता यांनी दि. १२.०९.२०२२ रोजीच्या अर्जान्वये *" मागीतलेली माहिती मिळाली नाही. "*असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक ०२.०४.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तसेच जन माहिती अधिकारी श्री.बाळाराम के.जाधव, प्र.सहा.आयुक्त, प्रभाग समिती क्र.५, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" राजेंद्र विष्णु पातकर रा.नजराना टॉकीजसमोर, शिवम बिल्डींग, भिवंडी यांच्याकडून ॲड. संजय म्हात्रे यांनी दि.२२.०३.२०२२ रोजी आयुक्त साहेब भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी व सहायक आयुक्त, प्रभाग समिती क्र.५ यांना स्टील पार्किंगमध्ये अनाधिकृत बांधकाम झाल्याची नोटीस पाठविली होती. सदर नोटीसीबाबत अद्यापपर्यंत आपल्या विभागाने कुठलेही उत्तर न देण्याचे कारण न समजले नसल्याने कृपया तात्काळ त्याबाबत माहिती द्यावी. "*

तक्रारकर्ता अनुपस्थित असल्यामुळे तक्रार अर्जावर, गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.

सदर प्रकरणी उपस्थित जन माहिती अधिकारीयांनी असे निवेदन केले की, तक्रारकर्ता यांना अद्यापपर्यंत माहिती देण्यात आलेली नाही. प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिलेली नाही. तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी त्यांच्या दि.०८.०८.२०२२ रोजीच्या आदेशान्वये सात दिवसात माहिती उपलब्ध करुन देणेबाबत आदेशीत केल्यानंतरसुध्दा जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नाही.

यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये माहिती पुरविण्यासाठी झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे. तसेच, आता विद्यमान जन

माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती पुरविणे योग्य होईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त, प्रभाग समिती क्र.५, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांनी **तक्रारकर्ता यांना उपलब्ध माहिती हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.सुनिल भास्कर भोईर, सहा.आयुक्त, प्रभाग समिती क्र.५, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक ३०.०५.२०२२ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाकडे स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.०७.०५.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

राज्य माहिती आयोग
महाराष्ट्र

(शेखर चन्ने)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ०२ एप्रिल, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.सुनिल भास्कर भोईर, सहा.आयुक्त, प्रभाग समिती क्र.५, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, जुना एस.टी.स्टॅण्ड, कापआळी, ता.भिंवडी, जि.ठाणे ४२१ ३०२.

**- यांना प्रत**

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त,
प्रभाग समिती क्र.५, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,
जुना एस.टी.स्टॅण्ड, कापआळी, ता.भिंवडी, जि.ठाणे ४२१ ३०२.

**यांचे मार्फत रवाना.**